# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 17 March 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १७ मार्च २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त सर्वत्र विविध कार्यक्रम–भिवंडीत महाराजांच्या मंदिराचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण–मंदिराला तीर्थस्थळाचा दर्जा
- औरंगजेबाचं उदात्तीकरण करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाईचा मुख्यमंत्र्यांचा इशारा
- एआय तंत्रज्ञानाच्या वापरातून कृषी क्षेत्राला नवसंजीवनी–अर्थसंकल्पावर चर्चेच्या उत्तरात अर्थमंत्र्यांचं प्रतिपादन

आणि

- देशभरात रेल्वेचे जुने डबे बदलून अत्याधुनिक एलएचबी डबे लावण्याचा केंद्र शासनाचा निर्णय

****

छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार जयंती आज राज्यात ठिकठिकाणी साजरी करण्यात येत आहे. या निमित्तानं शिवनेरीसह विविध गड किल्ल्यांवर शिवभक्तांकडून अनेक कार्यक्रम घेण्यात आले. ठाणे इथं छत्रपती शिवाजी महाराजांच्या ४५ फुटी पुतळ्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याहस्ते अनावरण करण्यात आलं, तर ठाणे जिल्ह्यातल्या भिवंडी इथं आज छत्रपती शिवाजी महाराज मंदिराचं लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आलं. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याशी संबंधित स्थळांचा विकास करुन, त्यांच्या कार्याची प्रेरणा घेत असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं, ते म्हणाले –

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

या मंदिराला तीर्थस्थळाचा दर्जा देण्याची घोषणा करतानाच मुख्यमंत्र्यांनी, या मंदिराच्या विकासासाठी शासनाकडून सर्व प्रकारचं सहकार्य करण्याचं आश्वासन दिलं.

दरम्यान, औरंगजेबाच्या पाशवी विचारांचे महिमामंडन अथवा उदात्तीकरण करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करून, ते विचार तिथेच चिरडून टाकण्यात येईल, असं फडणवीस यांनी नमूद केलं. ते म्हणाले –

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात खुलताबाद इथं असलेली औरंगजेबाची कबर हटवण्याच्या मागणीसाठी विश्व हिंदू परिषद तसंच बजरंग दलाच्या वतीने आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आलं. राज्यभरात विविध ठिकाणी या संघटनांनी आज आंदोलन केल्याचं वृत्त आहे.

****

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची औरंगजेबाशी तुलना केल्याप्रकरणी कारवाई करावी अशी मागणी, गटनेते प्रवीण दरेकर यांनी विधान परिषदेत केली. यावर सभापती राम शिंदे यांनी कारवाईचं आश्वासन दिलं.

दरम्यान, आपण फडणवीस सरकारच्या कारभाराची तुलना औरंगजेबाच्या कारभाराशी केली. औरंगजेब या व्यक्तीशी फडणवीस यांची तुलना केलेली नाही, असा खुलासा सपकाळ यांनी केला आहे, ते मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते.

****

विधानसभेत आज अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर दिलं. शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासाचा रोडमॅप मांडणारा हा अर्थसंकल्प असल्याचं ते म्हणाले. येत्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता AI तंत्रज्ञानाचा वापर हा कृषी क्षेत्राला नवसंजीवनी देणारा ठरेल असा विश्वास पवार यांनी व्यक्त केला. ते म्हणाले –

**बाईट – उपमुख्यमंत्री अजित पवार**

राज्याच्या तसंच सामाजिक हिताच्या योजना सरकार बंद करणार नाही. परंतु गरज नसलेल्या योजना सरकार बंद करेल, असं पवार यांनी स्पष्ट केलं. लाडकी बहिण योजनेत सुधारणा करण्याची भूमिका त्यांनी व्यक्त केली.

****

विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आज छत्रपती संभाजीनगरच्या पाणी पुरवठ्याचा प्रश्न सदनात उपस्थित केला. नियमित पाणी पुरवठ्याच्या दृष्टीने पाण्याच्या व्यवस्थापनासाठी सरकार काही उपायोजना करणार आहेत का, असा प्रश्न दानवे यांनी उपस्थित केला. पाण्याचे योग्य व्यवस्थापन केल्यास, छत्रपती संभाजीनगरला किमान दोन दिवसाआड पाणी मिळेल अशी सूचना नियम ९३ अन्वये त्यांनी मांडली.

बीड जिल्ह्यात केज इथले शिक्षक धनंजय नागरगोजे आत्महत्या प्रकरणी संबंधित संस्थाचालकावर गुन्हा दाखल करावा अशी मागणीही दानवे यांनी केली. विना अनुदानित शाळांमधल्या शिक्षकांना वेतन देणं संस्थाचालकांना बंधनकारक करावं अशी सूचना दानवे यांनी केली, या प्रकरणाची सखोल चौकशी करून कारवाई केली जाईल असं गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी सांगितलं.

****

विधानपरिषदेच्या पाच रिक्त जागांच्या पोटनिवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी आज सहा उमेदवारांनी अर्ज दाखल केले. या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून संजय खोडके, भाजपकडून संजय केणेकर, दादाराव केचे आणि संदीप जोशी तर शिवसेनेकडून चंद्रकांत रघुवंशी आणि अपक्ष उमेश म्हेत्रे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. या निवडणुकीसाठी गरज भासल्यास, २७ मार्च रोजी मतदान आणि मतमोजणी होणार आहे.

****

देशभरात रेल्वेचे सगळे जुने डबे बदलून अत्याधुनिक एलएचबी डबे लावण्यात येणार आहेत. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज राज्यसभेत ही माहिती दिली. आतापर्यंत ४१ हजार एलएचबी डबे तयार झाल्याची माहिती वैष्णव यांनी दिली. ते म्हणाले –

**बाईट – रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव**

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वेरुळ लेण्यांमध्ये मधमाशांनी आज पर्यटकांवर हल्ला केल्याचा प्रकार घडला. कैलास लेणे परिसरात घडलेल्या या प्रकारात काही पर्यटक जखमी झाले तर अतिप्रमाणात मधमाशा चावलेला एक परदेशी पर्यटक बेशुद्ध पडला, त्याच्यावर वेरुळ इथं प्रथमोपचार करून त्याला छत्रपती संभाजीनगर इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय-घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आल्याची माहिती पुरातत्व विभागाचे छत्रपती संभाजीनगर इथले अधीक्षक डॉ शिवकुमार भगत यांनी दिली.

****

सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांना पोलिसांनी बजावलेल्या नोटीसच्या अनुषंगाने त्यांनी आज बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांची भेट घेतली. पोलीस दलातील २६ पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या तक्रारीचे पुरावे सादर करून, कर्मचाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांची तातडीने बदली करावी, अशी मागणी त्यांनी केली.

दरम्यान, बीड जिल्ह्यातल्या आष्टी इथला ट्रक चालक विकास बनसोडे हत्या प्रकरणात सहा जणांना आष्टी पोलीसांनी अटक केली, तर चार आरोपी फरार झाले. मालकाने केलेल्या मारहाणीत या तरुणाचा मृत्यू झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणी दहा जणांविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल आहे.

****

परभणी इथं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आज जायकवाडी कार्यालयासमोर आंदोलन केलं. पाणी मिळत नसल्याची तक्रार करत संतप्त कार्यकर्त्यांनी कार्यालयाला कुलूप ठोकले. मुख्य अभियंता जयंत गवळी यांनी पाणी सोडण्याचं आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आलं.

****

नांदेड जिल्हा परिषदेच्या २०२५-२६ च्या २२ कोटी २६ लाख रुपयांच्या अर्थसंकल्पाला आज जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी मान्यता दिली. यावेळी २०२४-२५च्या सुधारीत अर्थसंकल्पालाही मान्यता देण्यात आली.

****

छत्रपती संभाजीनगर इथं बजरंग चौकातील श्री दत्त गुरू मंदिरात आजपासून सात दिवसांच्या 'श्री छत्रपती शिवप्रताप' या ग्रंथाच्या पारायण सोहळ्याचं आयोजन

करण्यात आलं आहे. या पारायणासह मंदिर परिसरात विविध विषयांवरील व्याख्यानाचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

लातूर इथं शिवसेना शहर शाखेच्यावतीनं छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. यावेळी शिवछत्रपती ग्रंथालयाला छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावरील ग्रंथ भेट देण्यात आले.

****

लातूर इथं एका उपाहारगृहाला आज सकाळी भीषण आग लागली. अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी आगीत अडकलेल्या सर्वांना सुखरूप बाहेर काढल्यामुळे सुदैवाने या घटनेत कसलीही जीवितहानी झाली नाही.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पाचोड इथं लाकडी दरवाजांच्या कारखान्याला काल रात्री आग लागली, आग विझवण्याचं काम आज सकाळी ११ वाजेपर्यंत सुरू होतं, आगीत कारखान्याचं मोठं नुकसान झालं, मात्र जीवीत हानी झाली नाही. आगीचं नेमकं कारण अद्याप समजलेलं नाही.

****